REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 4 | JANUARY - 2021

# कोविड-१९ च्या कोरोना महामारी मध्ये ऑनलाईन अध्यापनाबाबत बी.एड. विद्यार्थी शिक्षकांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे

डॉ. सचिन गौतम इंगळे[1] , डॉ. पुष्पांजली सचिन इंगळे [2]
[1](M.A. M.Ed., M.Phil., Ph.D., NET-SET)
सहाय्यक प्राध्यापक सोशल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.
[2](M.Sc., M.Ed., Ph.D., NET-SET)
सहाय्यक प्राध्यापक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर ( एम.एड विभाग )

**संशोधन विषय विवेचन**



सध्या सर्व जगावर सर्वात मोठे संकट निर्माण झाले आहे, ते म्हणजे कोविड-१९ कोरोना महामारीचे.खरे पाहता सद्यस्थितीला जीवन जगण्याची नवी शर्यतच निर्माण झाली आहे. म्हणजेच काय तर मानवी जीवनाचे अस्तित्व टिकवण्यासाठी विविध विविध तंत्रज्ञानाचा उपयोग केला जात आहे. या कोविड-१९ च्या कोरोना महामारी मध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल झालेला दिसून येत आहे. विशेषता आरोग्य क्षेत्रामध्ये, पर्यावरणाच्या क्षेत्रामध्ये, मानवी व्यवहारांमध्ये आणि विशेष म्हणजे शिक्षण क्षेत्रामध्ये तर अत्यंत आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो आहे. शिक्षण हे ज्ञानरचना निर्माण करणारे प्रमुख साधन आहे. शिक्षणानेच माणसाचे विचार व व्यक्तिमत्व निर्माण होते. या शिक्षणाची प्रक्रिया कोविड-१९ या कोरोना महामारी मध्ये पूर्णपणे म्हणता येणार नाही मात्र मंदावली आहे असं जरूर आपल्यास म्हणता येऊ शकते. सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर येथील बी.एड.च्या विद्यार्थी शिक्षकांचा ऑनलाईन पद्धतीने अध्यापन बाबतचा दृष्टिकोन अभ्यासणे.

**मुख्य मुद्दे :** ऑनलाईन अध्यापन, बीएड चे विद्यार्थी शिक्षक मतावली.

## प्रस्तावना

प्राथमिक शिक्षणा पासून ते महाविद्यालय शिक्षण आणि तांत्रिक शिक्षणा पर्यंतचे सर्व शिक्षण हे या कोविड-१९ च्या धोरणाच्या महामारी मुळे संगणक तंत्रज्ञान इंटरनेट माध्यमाचा उपयोग करत राबविले जात आहे. यामध्ये शिक्षणाची अशी कोणतीही शाखा अलिप्त राहू शकली नाही जेथे महामारी कोरोना चा प्रभाव झालेला नाही, विशेष म्हणजे शिक्षक शिक्षण शाखेवर याचा खूप मोठा प्रभाव झालेला

दिसून येतो आहे. म्हणून ही शिक्षक शिक्षणाची प्रक्रिया अविरत राहावी म्हणून महाविद्यालय,विद्यापीठ व महाराष्ट्र शासन यांच्याद्वारे संगणक तंत्रज्ञानाद्वारे इंटरनेट माध्यमाचा उपयोग करून जे विविध अध्यापन उपयुक्त असे उपयोजनात्मक साधन निर्माण झाले आहेत यांचा अध्यापनाच्या कार्यामध्ये उपयोग केला जातो आहे. त्याच्यामध्ये गूगल मीट , गूगल क्लासरूम, झूम मीटिंग, वेबएक्स, स्त्रीम याड, व्हाट्सअप क्लासेस, जांमबोर्ड, आणि अत्यंत प्रभावीपणे वापरले जाणारे युट्युब हे सद्यस्थितीला अध्यापनासाठी सर्व क्षेत्रांमध्ये उपयोगात आणले जात आहे.

काल पर्यंत आपण MSCIT,RTO यांच्याबाबत ऑनलाईन परीक्षा व अध्यापनासाठी हा संदर्भ ऐकत होतो. तर काही शिष्यवृत्तीच्या परीक्षा विशेष केंद्र शासनाच्या वतीने उपयोगात आणलेल्या स्पर्धापरीक्षा या बाबत आपण फक्त ऐकत होतो मात्र आजच्या स्थितीला या सर्व बाबी आपण प्रत्यक्ष पणे अध्यापनात उपयोगात आणत आहोत. हाच विचार मनामध्ये ठेवून संशोधकाने बी.एड. च्या विद्यार्थी शिक्षकांचा ऑनलाईन अध्यापना बाबत कसा दृष्टिकोन आहे. हे जाणून घेण्याची चिकित्सा मना मध्ये निर्माण झाल्याने हे संशोधन कार्य हाती घेतले आहे.

### संशोधनाची गरज.

सदर संशोधने अत्यंत गरजेचे आहे त्याचे कारण असे की कोविड१९ च्या कोरोना महामारी या कालावधीमध्ये सर्वच क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल झालेले आहेत. तसेच शिक्षण प्रक्रिया मधील अध्यापनाच्या कार्यवाही मध्ये सुद्धा अमूलाग्र बदल झालेले दिसून येत आहे आपण प्रत्यक्ष वर्गांमध्ये उपस्थित न राहता इंटरनेटच्या माध्यमातून विविध ॲप्लिकेशन चा उपयोग करून विद्यार्थ्यांना विषयांचे अध्यापन करतो आहोत. याबाबत विद्यार्थ्यांची आकलनक्षमता कोणत्या आणि कशा प्रकारे होत आहे अथवा त्याबाबत त्यांचे दृष्टिकोन कसे निर्माण होत आहेत याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे म्हणून हे संशोधन निर्मित करण्यात आलेले आहे.

या संशोधनाद्वारे आपणास हेही माहिती होईल की, विद्यार्थ्यांना ऑनलाईन अध्यापना द्वारे कितपत उपयोग होतो आहे आणि त्यांच्या ज्ञानरचना मध्ये वाढ होते आहे का नाही ? हे ही आपण त्यांच्या मतांची पडताळणी करण्यासाठी अथवा जाणून लक्षात घेण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे.

### संशोधनाची उद्दिष्टे

1) कोविड-१९ कोरोना महामारी च्या कालावधीमध्ये सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर बी.एड. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अध्यापन केल्यामुळे त्यांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

2) सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर बीएड विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अध्यापनाच्या वस्तुस्थितीचा अभ्यास करणे.

### संशोधनाचे महत्व.

सदरचे संशोधन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याचे कारण असे की, शिक्षण हे व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. याच शिक्षणाद्वारे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. शिक्षणाद्वारे सुजाण व विवेकशील नागरिक निर्माण होतात.शिक्षण हे व्यक्तीला परिपूर्ण राष्ट्र व समाज घडविण्यासाठी पोषक ठरते. होणारे जे शिक्षक आहेत ते परिपूर्ण ज्ञानसंपन्न असणे गरजेचे आहे. जेणेकरून त्या राष्ट्राचे येणारे भविष्य हे उज्वल ठरण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांनी आपल्या ज्ञानामध्ये अधिक भर टाकली पाहिजे. हे सर्व जाणून घेण्यासाठी सदरचे संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे.

सदर संशोधनाचा उपयोग शिक्षण क्षेत्रामधील सर्व व्यक्तींना होणार आहे.

### संशोधनाची व्याप्ती.

सदर संशोधनामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेले सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूरशी संबंधित आहे.

सदर संशोधनामध्ये फक्त या सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन येथील बी.एड. विद्यार्थी शिक्षकांचा विचार केलेला आहे.

सदरच्या संशोधनामध्ये कोविड-१९ कोरोना महामारी मध्ये महाविद्यालयाच्या मार्फत ऑनलाईन पद्धतीने अध्यापनाचे कार्य केलेले आहे यासंबंधीतिचाच विचार करण्यात आलेला आहे.

### संशोधनाची मर्यादा.

सदर संशोधन हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची संलग्नित असलेल्या सोलापूर सोशल असोसिएशन ऑफ कॉलेज एज्युकेशन सोलापूर या महाविद्यालयाचा विचार केलेला आहे इतर कोणत्याही संलग्नित महाविद्यालयाचा, विद्यापीठाची विचार केलेला नाही.

सदर संशोधनामध्ये फक्त सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर याच महाविद्यालयामध्ये असलेल्या 2020-21 या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आलेला आहे.

सदर संशोधन हे बी.एड.च्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अध्यापन कार्याच्या संबंधित त्यांचा दृष्टिकोनाचा अभ्यास करण्यात आलेला आहे इतर कोणत्याही बाबीचा अभ्यास यात करण्यात आलेला नाही.

### संशोधनाचा नमुना निवड

सदर संशोधनासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाशी संलग्नित असलेले सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर येथील एकूण 48 पैकी 40 विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आलेला आहे. म्हणजेच 83 % विद्यार्थ्यांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आलेली आहे.

### संशोधनाची साधने.

विद्यार्थी शिक्षक दृष्टीकोन मतावली. ही विद्यार्थी शिक्षक दृष्टिकोन मतावली ही शिक्षण क्षेत्रातील तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेले आहे.

### संशोधनाची कार्यपद्धती.

सदर संशोधन हे वर्तमान स्थितीवर अवलंबून असल्यामुळे संशोधकांनी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील शालेय शालेय सर्वेक्षण या पद्धतीची निवड करण्यात आली आहे.

### संशोधनाचे निष्कर्ष.

1) 50 % विद्यार्थी शिक्षक हे ऑनलाईन पद्धतीने अध्यापन हे योग्य आहे या मताशी सहमत आहेत. तर 50 % विद्यार्थी ऑनलाईन अध्यापन योग्य नाही असे मत व्यक्त करतात.

2) 40 % विद्यार्थी शिक्षक हे ऑनलाईन अध्यापना मुळे परीक्षेच्या तयारी करण्यासाठी चांगला कालावधी मिळतो या मताशी सहमत आहेत. तर 60 % विद्यार्थी ऑनलाईन अध्यापन झाल्यामुळे अध्ययन याकडे दुर्लक्ष होते असे मतव्यक्त करतात.

3) 20 % विद्यार्थी शिक्षक हे ऑनलाईन अध्यापन चांगले आहे या मताशी सहमत आहेत तर 80 टक्के विद्यार्थी हे ऑनलाईन अध्यापनात हे पाहिजे तितके प्रभावी नाही या मताशी सहमत आहेत.

4) 100 % विद्यार्थ्यांचे असे मत आहे की ऑनलाईन अध्यापन हे शारीरिक उपस्थिती पेक्षा अत्यंत वेगळे आहे त्यामध्ये पाहिजे तितकी अध्यापन नैसर्गिक प्रक्रिया पूर्ण होत नाही असे मत व्यक्त करतात.

5) 100 % असे विद्यार्थी शिक्षकांचे मत आहे की ऑनलाईन अध्यापनामध्ये काही तांत्रिक इंटरनेटच्या कनेक्टिविटी चे प्रॉब्लेम निर्माण होऊ शकतात तर अध्यापनात अडथळा निर्माण होतो असे मत व्यक्त करतात

6) 100 % विद्यार्थ्यांचे असे मत आहे की ऑनलाईन अध्यापनात मध्ये अवधान केंद्रीकरण कक्षा सदैव राखणे शक्य होत नाही.

7) 100 % विद्यार्थ्यांचे असे मत आहे की एखाद्यावेळेस विद्युत पुरवठा खंडित, झाला इंटरनेट कनेक्टिव्हिटी योग्य नसेल, हवामान अथवा वातावरणातील बदल योग्य नसतील तर अध्यापनात संवाद साधणे अवघड होते व सुयोग्य पद्धतीने संवाद साधताना खूप अडचणींना सामोरे जावे लागते. तसेच अध्यापना दरम्यान व्हिडिओ प्ले केला तर त्याचे पिक्सल ब्रेक होतात व अध्यापनात तुटकपणा निर्माण होतो असे मत व्यक्त करतात.

8) 60 % विद्यार्थ्यांचे असे मत आहे की ऑनलाईन पद्धतीने अध्यापन कार्य केल्याने विषयाची तयारी होते तर 40 टक्के विद्यार्थी शिक्षकांचे असे मत आहे की ऑनलाईन पद्धतीने अध्यापनाची तयारी केली तर ती परिपूर्ण होत नाही असे मत व्यक्त करतात.

9) 100 % विद्यार्थी शिक्षकांचे असे मत आहे की प्रात्यक्षिक कार्य तपासणी करण्यामध्ये संवादात्मक अडचणी निर्माण होतात.

10) 50 % विद्यार्थ्यांची शिक्षकांचे असे मत आहे की ऑनलाईन अध्यापनाचा मुळे अध्यापनाचाकडे दुर्लक्ष होऊ शकते तर 50 टक्के विद्यार्थ्यांचे असे मत आहे की ऑनलाईन अध्यापन यामुळे अभ्यासासाठी वेळ मिळतो.

11) 60 % विद्यार्थी शिक्षकांचे असे मत आहे की ऑनलाईन अध्यापनाचा मुळे विद्यार्थी वैचारिक समूह तयार होतो व ते विचारांनी कार्य करतात. तसेच 40 % विद्यार्थ्यांचे असे मत आहे की विचारांची सुयोग्य पद्धतीने देवान-घेवान होत नाही.

12) 100 % विद्यार्थी शिक्षकांचे असे मत आहे की ऑनलाईन अध्यापन कार्यामुळे सर्वच प्रश्नांची उत्तरे, शंकांचे समाधान त्या वेळे मध्ये समाधान कारक मिळत नाहीत असे मत व्यक्त करतात.

13) 100 % विद्यार्थी शिक्षकांच्या मते ऑनलाईन अध्यापन हे दीर्घकालीन फायद्याचे नाही त्याचा उपयोग काही कालावधी पुरता मर्यादित करावा.

14) 100% विद्यार्थी शिक्षकांच्या मते ऑनलाईन अध्यापन पेक्षा वर्ग अध्यापन हे अधिक प्रभावी व परिणामकारक आहे व ऑनलाईन अध्यापन हे तात्पुरत्या स्वरूपाचेच असावे असे 100% विद्यार्थी-शिक्षक मत व्यक्त करतात.

15) कोविड-१९ कोरोना महामारी च्या कालावधीमध्ये 100 % विद्यार्थी शिक्षकांनी असे मत व्यक्त केले की आरोग्याची काळजी घेत, अध्ययनासाठी विविध तंत्रांचा उपयोग केला पाहिजे.

16) सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन महाविद्यालयाच्या वतीने ऑनलाईन अध्यापनासाठी गूगल मीट,झूम मीटिंग यांचा उपयोग केला जातो आहे.

## सारांश.

सदर संशोधनांमधून संशोधकांना असे आढळले की, सोलापूर सोशल असोसिएशन कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर या बी.एड. महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक विद्यार्थी शिक्षक हे गूगल मीट व झूम मीटिंग द्वारे अध्यापन कार्य करत आहेत

तसेच विद्यार्थी शिक्षकांना असे वाटते आहे की ऑनलाईन शिक्षणापेक्षा वर्गामध्ये उपस्थित राहून अध्ययन व अध्यापन प्रक्रिया प्रभावी ठरते.

शिवाय विद्यार्थी शिक्षकांना असेही वाटते की, वर्गातील अध्यापन हे नैसर्गिक प्रक्रियेने पूर्ण होते तर ऑनलाईन अध्यापन हे कॉम्प्युटर इंटरनेट कनेक्टिव्हिटी यांच्यामध्ये समस्या निर्माण झाली तर त्रासदायक ठरते.

तसेच ऑनलाईन अध्यापनामध्ये अवधान कक्षा सदैव एकाग्रशील राहत नाहीत तर वर्ग अध्यापनामध्ये अवधान कक्षा ह्या ऑनलाईन अध्यापन यापेक्षा अधिक राहतात असे मत व्यक्त केले.

## संशोधकाचा विचार.

होय खरे आहे सध्या जगावर आणि सर्व मानवी जातीवर कोविड-१९ कोरोना महामारीचा खूप प्रभाव झालेला आहे. या कारणे शिक्षणाची प्रक्रिया अविरत अखंडित राहावी म्हणून, ऑनलाईन अध्यापन हे एक साधन म्हणून उपयोगात आणले जात आहे.

मात्र विविध शिक्षण तज्ञ मानसशास्त्रज्ञ विचारवंत यांच्या विचारांचा पाठपुरावा केला तेव्हा असे लक्षात येते की, ऑनलाईन अध्यापन हे साध्य नाही तर साधन आहे ते तात्पुरत्या स्वरूपाचे आहे.

अध्यापनामध्ये नैसर्गिक वातावरणामधील संवाद व वर्ग अध्यापन हे अवधान कक्षा, विचार, संवेदना व विवेक निर्मितीसाठी अत्यंत गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ

1. www.WHO.COM
2. www.covide19.who.int
3. J.W.Best. 2000. Research Methodology.
4. दैनिक सकाळ विविध Covide19 वरील लेख